# बँक ऑफ महाराष्ट्र 'शीर्षस्थानी असणारे आघाडीचे सुधारक' या श्रेणीमध्ये सर्वद्वितीय




बँक ऑफ महाराष्ट्र 'शीर्षस्थानी असणारे आघाडीचे सुधारक' अर्थात 'फ्रंट-रनर्स इन टॉप इम्प्रूवर्स' या श्रेणीमध्ये सर्वद्वितीय ठरली आहे. भारताच्या वित्तमंत्री माननीय श्रीमती निर्मला सीतारमन यांची प्रमुख उपस्थितीत आणि भारतीय बँक्स संघटनेद्वारा आयोजित नवी दिल्ली येथे दिनांक 26 फेब्रुवारी 2020 रोजी ईज-3.0 या कार्यक्रमाचा अनावरण समारंभ संपन्न झाला. सांघिक भावनेतून केलेल्या कार्याचे प्रतिबिंब म्हणजे हा पुरस्कार असून तो अतिशय मानाचा मानला जातो. बँक ऑफ महाराष्ट्राला उत्कृष्ट कामगिरीच्या आधारावर वर्ष 2018 मध्येही ईज अंतर्गत पुरस्कार प्राप्त झाला होता आणि या वर्षीही त्याची पुनरावृत्ती झालेली आहे.